MHYA150008872023

## नियमित दिवाणी दावा क्र.३१/२०२३ मधील निशाणी क्र.२३ वरील आदेश

प्रस्तुतचा अर्ज हा वादी यांनी दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश ६ नियम १७ अन्वये दुरुस्तीची परवानगी मिळण्याकरिता दाखल केलेला आहे.

२. वादी यांनी नमुद केले की, प्रस्तुतचा दावा अतिक्रमीत शेत अतिक्रमण हटवुन शेतजमीनीचा प्रत्यक्ष ताबा मिळण्याकरीता दाखल केला आहे. प्रस्तुतच्या दाव्यामध्ये शेतजमीनीचे क्षेत्रफळ ०.१६ आर. असे नमुद केले आहे. त्याऐवजी ०.१६ हे. आर. असे नमुद करायचे आहे. म्हणुन सदरची चुक जाणुनबुजुन केलेली नाही. अनावधानाने लिहायचे राहुण गेले आहे. दावा निकाली काढण्यासाठी दुरुस्ती महत्वाची आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याचे स्वरुप बदलणार नाही. अर्ज मंजुर करण्यात यावा अशी वादी यांनी विनंती केली आहे.

३. प्रतिवादी यांनी म्हणणे सादर करुन सदरच्या अर्जास विरोध दर्शविला आहे. प्रतिवादी यांनी नमूद केले की, सदरच्या प्रकरणामध्ये वादीचा उलटतपास झालेला आहे. पुराव्यादरम्यान महत्वाचे तथ्ये अभिलेखावर सादर करण्यात आलेले आहेत. वादी यांनी दावा मिळकतीचा काही भाग वगळल्यामुळे दिवाणी प्रक्रिया संहितेचे आदेश २३ नियम १ च्या तरतुदीची बाधा देखील येते. तसेच वादी यांनी ड्यु डिलीजेंस असल्याचे दर्शविले नाही. म्हणुन प्रस्तुतचा अर्ज खर्चासह नाकारण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अभिलेखावरील दस्तऐवजाची पाहणी केली असता दिसून येते की, प्रस्तुत दावा अतिक्रमण हटवुन दावा मिळकतीचा ताबा मिळणेसाठी दिनांक २८/०६/२०२३ रोजी दाखल केला आहे. प्रस्तुतच्या प्रकरणामध्ये वादी यांचा उलटतपास झालेला आहे.

५. दाव्यामध्ये वर नमूद बाब टंकलेखीत व तांत्रीक स्वरुपाची असल्याचे दिसून येते. तसेच सदरची टंकलेखणाची झालेली चुक ज्ञानाच्या अभावामुळे झालेली चुक असल्याचे दिसुन येत नाही. सदरची टंकलेखणाची चुक अनावधानाने झाल्याचे दिसुन येते. वादीला सदरची टंकलेखनाची चुक दाव्यामध्ये चुकीचे नमुद करण्याचे कोणतेही योग्य व रास्त कारण असल्याचे दिसुन येत नाही. एकंदरीत दाव्यातील, अर्जातील कथन व प्रतिवादी यांचे म्हणणे विचारात घेता प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास प्रतिवादीच्या हक्कावर कोणताही परिणाम होत असल्याचे दिसुन येत नाही. मुळ दावा गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी वादी यांना सदर दाव्यामध्ये ०.१६ आर. ऐवजी ०.१६ हे.आर. हे नमुद करण्याची परवानगी देणे योग्य व संयुक्तीक असल्याचे दिसून येते.

६. दाव्याचे स्वरुप पाहता सदरची दुरुस्तीची मागणी मंजुर केल्यास प्रतिवादीला कोणतेही नुकसान होणार नसल्याचे व दाव्याचे स्वरुप बदलणार नसल्याचे दिसुन येते. प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी दिनांक १७/०६/२०२५ रोजी दाखल केला आहे. वादी यांनी प्रस्तुत दुरुस्तीचा अर्ज सादर करण्याकरिता केलेल्या विलंबाबाबत वादीवर योग्य खर्च लादणे आवश्यक आहे. वरील सर्व बाबींचा एकत्रितरित्या विचार करता मी या निष्कर्षाला आलो आहे की, वादी यांचा

अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दाखल करण्याकरिता केलेल्या विलंबाकरिता प्रतिवादी यांना रक्कम रुपये ५००/– पुढील तारखेपर्यंत देण्यात यावे.

३. वादी यांनी दाव्यात दुरुस्ती करुन दुरुस्तीची प्रत पुढील तारखेपर्यंत सादर करावी.

GAJANAN CHANDRAKANT FULZALKE

Digitally signed by GAJANAN CHANDRAKANT FULZALKE
Date: 2025.07.01 16:59:57 +0530

नेर. (जी. सी. फुलझळके)

दिनांक – ०१.०७.२०२५ दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, नेर.

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file Order/ Judgment are same word to word as per the original order/Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | :- | Ku. B. N. Nare<br>(Grade-III) |
| Court | :- | C.J.J.D. & J.M.F.C., Ner. |
| Date | :- | 01/07/2025 |
| Order/ Judgment signed by the Presiding Officer on | :- | 01/07/2025 |
| Order/Judgment uploaded on | :- | 01/07/2025 |